# मंत्रिमंडळ निर्णय
# ९ मार्च २०११

१. महिला आरक्षणात ५० टक्क्यांपर्यंत वाढ करण्याचा निर्णय.

२. मालमत्ता कर मंडळाची स्थापना.

३. गहू, तांदूळ व पामतेल या शिधावस्तूंच्या किंमती ३१ मार्चपर्यंत स्थिर ठेवण्याचा निर्णय.

४. कोराडी युनिट क्र. ६च्या आधुनिकीकरणासाठी जागतिक बँकेचे अर्थसहाय्य घेण्याचा निर्णय.

५. जिल्हा परिषदांसह स्थानिक स्वराज्य संस्थांचे सर्वच पदाधिकारी लोकायुक्त यांच्या कक्षेत.

६. महानगरपालिकांचे लेखापरीक्षण स्थानिक निधी लेखा कार्यालयामार्फत होणार.

७. मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षण अधिनियमात सुधारणा.

८. या वर्षीच्या साखर कारखाना गळीत हंगामासाठी वाहतूक अनुदान देण्याचा निर्णय.

९. भांडवली मूल्यावर आधारीत मालमत्ता कर आकारणीसाठी महानगरपालिका व नगरपरिषद अधिनियमात सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.

------------

## महिला आरक्षणात ५० टक्क्यांपर्यंत वाढ करण्याचा निर्णय

सध्या महाराष्ट्र राज्यामध्ये महापालिका, नगरपालिका, जिल्हापरिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत या ठिकाणी महिलांसाठी ३३ टक्के आरक्षण आहे. सदर आरक्षणामध्ये ३३ टक्क्यांवरून ५० टक्क्यांपर्यंत वाढ करण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

त्यामुळे सर्व शहरी व ग्रामीण स्थानिक संस्थांमध्ये महिला प्रतिनिधींच्या संख्येत वाढ होणार आहे. महिला सक्षमीकरण करण्याच्या दृष्टीने हा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

-----------

## मालमत्ता कर मंडळाची स्थापना

राज्य मंत्रिमंडळाने आज महानगरपालिका / नगरपरिषद मालमत्ता कर मंडळाची स्थापना करण्याचा निर्णय घेतला. तेराव्या वित्त आयोगाच्या अनुदान विषयक अटींची पूर्तता म्हणून या मंडळाची स्थापना करण्यात येत आहे.

तेराव्या वित्त आयोगाच्या अहवालानुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी ३ हजार १७७ कोटी ७१ लाख रुपये एवढे अनुदान केंद्र सरकारकडून राज्य सरकारला मिळणार आहे. या अनुदानाचे दोन प्रकार असून २ हजार ७७ कोटी ७१ लक्ष एवढे अनुदान सर्वसाधारण अनुदान असून, ११०० कोटी रुपयांचे अनुदान कामगिरीच्या आधारावर मिळणार आहे. मात्र कामगिरीच्या आधारावर मिळणाऱ्या अनुदानास पात्र होण्यासाठी ज्या नऊ बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे, त्यात मालमत्ता कर मंडळाची स्थापना ३१ मार्च २०११ पूर्वी करणे, या बाबीचा समावेश आहे. या अनुषंगाने मंत्रिमंडळाने हा निर्णय घेतला आहे. त्यामुळे कामगिरीवर आधारित अनुदान (११०० कोटी रुपये) मिळण्याचा मार्ग सोपा झाला आहे.

या मंडळाची रचना अध्यक्ष आणि चार सदस्य अशी असेल. अध्यक्ष हे सर्वोच्च न्यायालयाचे किंवा उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायमूर्ती किंवा राज्य शासनाचे मुख्य सचिव/अतिरिक्त मुख्य सचिव किंवा केंद्राकडील सचिव दर्जाचे सेवानिवृत्त अधिकारी असतील. मंडळाच्या सदस्यपदी असलेल्या व्यक्ती महानगरपालिका प्रशासनाचे पुरेसे ज्ञान व अनुभव असलेले असतील. मंडळाचे मुख्यालय मुंबई येथे असेल.

या मंडळाची कार्यकक्षा निश्चित करण्यात आली आहे. मालमत्तेच्या मुल्यांकनाचे लेखापरीक्षा करणे, त्यात त्रुटी असल्यास सुधारणा करणे, हेतुपुरस्सर चुका केलेल्या असल्यास त्या निदर्शनास आल्यानंतर कारवाईची शासनाकडे शिफारस करणे, या संदर्भात काही वाद झाल्यास त्यावर निर्णय देणे, मालमत्ता करपध्दतीचा आढावा घेऊन त्यात सुधारणेची आवश्यकता असल्यास तशी शिफारस राज्य सरकारला करणे, आदि कर्तव्ये या मंडळाची असतील.

हे मंडळ ३१ मार्च २०११ पूर्वी स्थापन करणे अनिवार्य असल्याने यासंबंधीचा कायदा अध्यादेश प्रख्यापित करुन करण्यात येणार आहे.

----o-----

## गहू, तांदूळ व पामतेल या शिधावस्तूंच्या किंमती ३१ मार्चपर्यंत स्थिर ठेवण्याचा निर्णय

सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत वितरीत केल्या जाणाऱ्या गहू, तांदूळ आणि पामतेल या शिधावस्तुंच्या किंमती ३१ मार्च २०११ पर्यंत स्थिर ठेवण्याचा निर्णय आज आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

गहू, तांदूळ आणि पामतेल या शिधावस्तूंचे भाव स्थिर ठेवण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी राज्य सरकारने ऑगस्ट २००९ पासून सुरू केली आहे. खुल्या बाजारातील जीवनावश्यक वस्तुंचे दर लक्षात घेऊन या योजनेला वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली आहे. सद्य:स्थितीत या योजनेची मुदतवाढ ३१ जानेवारी २०११ पर्यंत होती, या पाचही जीवनावश्यक वस्तूंचे खुल्या बाजारातील दर व त्यांच्यातील चढ-उतार लक्षात घेता फक्त तांदुळ, गहू आणि पामतेल या तीन वस्तूंच्या किंमती ३१ मार्चपर्यंत स्थिर ठेवण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला. त्यासाठी ६४ कोटी ७५ लाख प्रतिमाह एवढा आर्थिक भार शासनावर पडणार आहे.

ooooo

## कोराडी युनिट क्र. ६च्या आधुनिकीकरणासाठी जागतिक बँकेचे अर्थसहाय्य घेण्याचा निर्णय

महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनीच्या कोळशावर आधारित कोराडी वीजनिर्मिती केंद्रातील संच क्र.६ जुना झाला असून त्याची आयुर्मर्यादा संपली आहे. २१० मेगावॅट क्षमतेच्या या संचाची सुधारणा करण्यासाठी जागतिक बँकेचे अर्थसहाय्य घेण्यास आणि त्यासाठी शासनाचा २० टक्के समभाग मंजूर करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने आज घेतला.

महानिर्मिती कंपनीचे एकूण ३४ औष्णिक वीजनिर्मिती संच कार्यरत आहेत व त्यापैकी १२ संचांचे आयुर्मान पुर्ण झाले आहे. हे सर्व संच प्रत्येकी २१० मेगावॅटचे आहेत. या संचांचे आधुनिकीकरण करणे आवश्यक असून जागतिक बँकेने त्याला अनुकुलता दर्शविली आहे. आधुनिकीकरणानंतर संचाच्या आजच्या सरासरी १८० मेगावॅट निर्मिती क्षमतेमध्ये ३५ मेगावॅटने वाढ होऊन उपयुक्त आयुर्मानात १५-२० वर्षांनी वाढ होईल.

कोराडी येथील संच क्र. ६च्या आधुनिकीकरणासाठी ४८६ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. जागतिक बँकेचे कर्ज ३०० कोटी, जागतीक बँकेचे अनुदान ६० कोटी रुपये, राज्य शासनाचे समभाग सहाय्य ९६ कोटी आणि महानिर्मितीचा सहभाग ३० कोटी अशा रितीने हा खर्च विभागला जाणार आहे.

---o---

## जिल्हा परिषदांसह स्थानिक स्वराज्य संस्थांचे सर्वच पदाधिकारी लोकायुक्त यांच्या कक्षेत

जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, नगरपालिका, महानगरपालिका यांच्या पदाधिकारी व कर्मचाऱ्यांना लोकायुक्त यांच्या कक्षेत लोकसेवक म्हणून समाविष्ट करण्याचा निर्णय आज आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

सध्या महाराष्ट्रात लोक आयुक्त व उप लोकआयुक्त अधिनियम १९७१ च्या तरतुदी लागू आहेत. त्यानुसार लोक आयुक्त यांच्या लोकसेवक कक्षेत स्थानिक स्वराज्य संस्थांचे सर्वच पदाधिकारी येत नव्हते.

सध्या लोक आयुक्त यांच्या कक्षेत लोकसेवक म्हणून खालील अधिकारी, पदाधिकारी यांचा समावेश आहे.

- सर्व महानगरपालिकांचे अधिकारी, कर्मचारी,
- जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, विषय समितींचे सभापती,
- पंचायत समितींचे सभापती, उपसभापती व विषय समित्यांचे सभापती,
- नगरपालिकांचे नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष व विषय समित्यांचे सभापती,

मंत्रिमंडळाने आज घेतलेल्या निर्णयामुळे खालील पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी लोक आयुक्त कायद्याच्या कक्षेत लोकसेवक म्हणून आले आहेत.

- जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगरपालिकांचे अधिकारी आणि कर्मचारी
- जिल्हा परिषदांचे सदस्य,
- पंचायत समित्यांचे सदस्य,
- नगरपालिकांचे नगरसेवक,
- महानगरपालिकांचे महापौर, उपमहापौर, विषय समित्यांचे सभापती व नगरसेवक,

तेराव्या वित्त आयोगाच्या अनुदानविषयक शिफारशींनुसार ही सुधारणा करण्यात येत असून ती ३१ मार्च २०११ पूर्वी होणे आवश्यक असल्याने अध्यादेशाद्वारे होणार आहे.

ooooo

## महानगरपालिकांचे लेखापरीक्षण
## स्थानिक निधी लेखा कार्यालयामार्फत होणार

राज्यातील महानगरपालिकांचे लेखापरीक्षण स्थानिक निधी लेखा कार्यालयामार्फत करण्याचा आणि महानगरपालिकांमध्ये मुख्य लेखापरीक्षक पदावर शासनामार्फत नियुक्ती करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने आज घेतला. यानुसार संबंधित अधिनियमांमध्ये तशी सुधारणा केली जाणार आहे.

तेराव्या वित्त आयोगाने नागरी स्वराज्य संस्थांमधील लेखांकन आणि लेखापरीक्षण पद्धत अधिक बळकट करण्याची शिफारस केली आहे. त्या अनुषंगाने ही सुधारणा करण्यात आली आहे. यासाठी मुंबई महानगरपालिका अधिनियम १९८८, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ व नागपूर शहर महानगरपलिका अधिनियम १९४८ मध्ये अध्यादेशाद्वारे आवश्यक ती सुधारणा करण्यात येत आहे.

ooooo

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षण
## अधिनियमात सुधारणा

तेराव्या वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार राज्यातील सर्व महानगरपालिकांचे लेखापरीक्षण संचालक -स्थानिक निधी लेखा' यांच्यामार्फत करण्याची सुधारणा संबंधित अधिनियमात करण्याचा निर्णय आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

सध्या राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांचे लेखापरीक्षण मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० अनुसार 'मुख्य लेखा परीक्षक-स्थानिक निधी लेखा' यांच्यामार्फत करण्यात येते. राज्यातील महापालिकांपैकी फक्त नागपूर महापालिकेचे लेखा परीक्षण स्थानिक निधी लेखा संचालनालयामार्फत करण्यात येते. इतर महापालिकांचे लेखा परीक्षण या संचालनालयामार्फत होत नाही.

तेराव्या वित्त आयोगाने केलेल्या शिफारशींनुसार सन २०१०-११ ते २०१४-१५ या पाच वर्षांसाठी राज्यातील नागरी स्वराज्य संस्थांसाठी निधी उपलब्ध होणार आहे. मात्र हा निधी प्राप्त होण्यासाठी राज्यातील सर्व महापालिकांचे लेखा परीक्षण स्थानिक लेखा निधी संचालनालयामार्फत होणे आवश्यक असल्याने या अधिनियमात तशी सुधारणा करण्यात आली आहे. आता यापुढे नागपूरसह सर्वच महापालिकांचे लेखापरीक्षण या संचालनालयामार्फत करण्यात येईल. ही सुधारणा ३१ मार्च २०११ पर्यंत करणे आवश्यक आहे.

-----------

## या वर्षीच्या साखर कारखाना गळीत हंगामासाठी वाहतूक अनुदान देण्याचा निर्णय

साखर कारखान्याच्या गळीत हंगाम २०१०-११ साठी वाहतुक अनुदान मंजूर करण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. त्यानुसार जे कारखाने १६ मार्च,२०११ पासून अतिरिक्त ऊसाचे गाळप करतील अशा कारखान्यांसाठी वाहतुक अनुदानासाठी ५० किलोमीटरवरील अंतरासाठी ३ रुपये प्रती टन प्रति किलोमीटर अनुदान मंजूर करण्याचा निर्णय घेण्यात आला.

सन २०१०-११ या गळीत हंगामामध्ये काही सहकारी साखर कारखाने सुरु होऊ शकले नाहीत. या कारखान्यांचे कार्यक्षेत्रातील उपलब्ध असलेल्या ऊसाचे गाळप करण्यासाठी ऊसाचे वितरण नजीकच्या साखर कारखान्यांना करणे आवश्यक आहे.

तसेच गळीत हंगाम २०१०-११ उशिरा सुरु झाल्याने काही कारखान्यांच्या कार्यक्षेत्रातील ऊसाचे पूर्णपणे गाळप होऊ शकणार नाही. अशा परिस्थितीत या कारखान्यांच्या कार्यक्षेत्रातील अतिरिक्त ऊस इतर कारखान्याकडून गाळप करणे आवश्यक राहणार आहे. त्यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे.

-----------

## भांडवली मूल्यावर आधारीत मालमत्ता कर आकारणीसाठी महानगरपालिका व नगरपरिषद अधिनियमात सुधारणा करण्यासाठी अध्यादेश

महानगरपालिका/नगरपरिषदेमार्फत आकारण्यात येत असलेल्या पट्टीयोग्य मूल्यावर आधारीत मालमत्ता कर आकारणी बरोबरच भांडवली मूल्यावर मालमत्ता कर आकारणीचा पर्याय उपलब्ध करण्यासाठी महानगरपालिका तसेच नगरपरिषदा अधिनियमात योग्य त्या तरतूदी करण्यात आल्या आहेत. यानुसार मुंबई महानगरपालिकेने दिनांक १ एप्रिल,२०१० पासून भांडवली मूल्यावर आधारीत मालमत्ता कर आकारणी करावी असा निर्णय आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

मुंबई महानगरपालिकेत भांडवली मूल्यावर आधारीत कर आकारणीची अंमलबलावणी करण्यात येत असताना आलेल्या अडचणी लक्षात घेऊन मुंबई महानगरपालिका अधिनियम,१८८८ मध्ये व इतर महानगरपालिका/ नगरपालिका अधिनियमात काही संक्रमणकालीन तरतूदी करण्याची आवश्यकता विचारात घेवून मंत्रिमंडळाने पुढीलप्रमाणे तरतूदी करण्याचे ठरविले:-

(१) मुंबई महानगरपालिका अधिनियम,१८८८ मधील तरतूदीनुसार मालमत्तांचे भांडवली मूल्य निश्चित करण्याचा कालावधी ३१ मार्च,२०११ पर्यंत आहे. तथापि, विहित कालावधीत सदर प्रक्रीया पूर्ण होणे शक्य होत नसल्याने, सदर भांडवली मूल्य निश्चितीची प्रक्रीया

२०११-१२ पर्यंत सुरु ठेवणे आवश्यक आहे. त्याकरीता मुंबई महानगरपालिका अधिनियमात सुधारणा करणे.

इतर महानगरपालिका/नगरपालिकांमध्ये देखील मालमत्ता कराची आकारणी भांडवली मूल्याच्या आधारावर करण्याचा निर्णय घेतलेल्या दिनांकापासून काही मालमत्तांची भांडवली मूल्यावर आधारीत मालमत्ता कर आकारणी काही कारणास्तव शक्य नसल्यास अशी आकारणी ज्या आर्थिक वर्षात प्रथमच करण्यात येईल,त्या आर्थिक वर्षाच्या अखेरपर्यंत सदर मालमत्तांची कर देयके नवीन कर प्रणाली लागू केल्याच्या दिनांकाच्या लगत पूर्वीच्या वर्षाच्या करा इतके तात्पुरते देयक म्हणून निर्गमित करणे अनुज्ञेय असेल व अशा तात्पुरत्या देयकाची रक्कम सदर इमारतींच्या भांडवली मूल्यावर आधारीत अंतिम देयकात समायोजित करण्यात येईल, अशी तरतूद करणे.

(२) पाणीकर, जल लाभ कर, मलनिःसारण कर व मलनिःसाण लाभ कर यांच्या दरात करण्यात येणारी कोणतीही सुधारणा संबंधित महानगरपालिकेत अथवा नगरपरिषदेत ज्या दिनांकापासून भांडवली मूल्यावर आधारीत मालमत्ता कर लागू होईल, त्या दिनांकापासून लागू राहील, अशी तरतूद करणे.

(३) मुंबईमध्ये दिनांक १ एप्रिल,२०१० रोजी लिव्ह अॅन्ड लायसन्स तत्वावरील गाळ्यांचे कर निर्धारण भाडयावर करण्याऐवजी मालकी तत्वावर कर निर्धारित केले असता जो कर आकारण्यायोग्य झाला असता, त्या कराशी तुलना करुन नवीन भांडवली मूल्यावरील करआकारणी करण्याकरीता मुंबई महानगरपालिका अधिनियमात सुधारणा करणे व त्याचप्रमाणे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम,१९४९,नागूपर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ व महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम,१९६५ मध्ये ज्या दिनांकापासून भांडवली मूल्यावर आधारीत मालमत्ता कर आकारणी संबंधित महानगरपालिकेत किंवा नगरपरिषदेत लागू करण्यात येईल त्या दिनांकापासून वरील तरतूदी लागू होतील अशी सुधारणा करणे.

(४) पट्टीयोग्य मूल्य अथवा भांडवली मूल्य निश्चितीच्या प्रक्रीयेत कोणत्याही मालमत्तेचे कोणत्याही कारणाने कर निर्धारण करावयाचे राहून गेले असल्यास, अशी मालमत्ता ज्या तारखेस कर निर्धारित करणे आवश्यक होते, त्या दिनांकापासून ६वर्षे पर्यंत त्याचे कर निर्धारण करणे शक्य व्हावे म्हणून महानगरपालिका/नगरपरिषदा अधिनियमात सुधारणा करणे.

मुंबई महानगरपालिकेत भांडवली मूल्यावर आधारीत मालमत्ता कराची आकारणी २०१०-११ या आर्थिक वर्षापासून करण्यास सुरुवात केली आहे. यामध्ये वरील तरतूदीअभावी अडचणी उद्‌भवू नयेत याकरीता प्रस्तुत तरतूदी मुंबई महानगरपालिका अधिनियम,१८८८ मध्ये तात्काळ करणे गरजेचे असल्यामुळे अध्यादेश प्रख्यापित करुन प्रस्तुत तरतूदी करण्यात येतील.

**********